**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.शिक्षण/आर.टी.ई/११०८/१८
दिनांक :- २४/५/२०१८

**प्रति,**

**१)** प्रशासकीय अधिकारी, पुणे महानगरपालिका पुणे
२) प्रशासन अधिकारी, पिं.चि. मनपा
३) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती -------(सर्व)

**विषय :-** शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकाकरिता २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत..

**संदर्भ :- १)** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. आर.टी.ई. २०१७/प्र.क्र. ३१५/एस.डी-१ दिनांक १६ जानेवारी, २०१८.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय आर.टी.ई २०१७/प्र.क्र. ३१५/एसडी१ दिनांक १७/५/२०१८.
२) मा. संचालक (प्राथमिक) म.रा. पुणे यांचे १९/५/२०१८ चे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सन २०१८.१९ या शैक्षणिक वर्षाकरिता संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार वंचित गटामध्ये विजा (अ), भटक्या जमाती (ब),भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग (OBC), विशेष प्रवर्ग (SBC) या संवर्गाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे SC, ST संवर्गाप्रमाणे या संवर्गातील बालकांच्या पाल्यांना उत्पन्नाच्या मर्यादेची अट लागू राहणार नाही. तथापि जात प्रमाणपत्राची आवश्यकता राहिल.

तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार एच.आय.व्ही. बाधित/एच.आय.व्ही प्रभावित बालकांच्या पालकांनाही उत्पन्नाच्या मर्यादेची अट लागू राहणार नाही पण त्यांच्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समकक्ष अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

सन २०१८.१९ मध्ये प्रवेश घेताना पालकांचे सन २०१६.१७ अथवा सन २०१७.१८ या वर्षातील उत्पन्नाचा दाखला प्रवेशाकरिता ग्राहय समजण्यात यावा.

त्यानुषंगाने **पुणे जिल्हा** करिता पालकांना ऑनलाईन अर्ज करण्यासाठी **दिनांक २४/५/२०१८ ते दिनांक ३१/५/२०१८ पर्यंत** सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ज्या पालकांना पहिल्या प्रवेश फेरीमध्ये अर्ज करता आला नाही त्या पालकांना नव्याने अर्ज करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच ज्या पालकांनी सुरुवातीला अर्ज केले असतील त्यांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. पालक/विद्यार्थ्यांना सदरचे ऑनलाईन अर्ज www.student.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर किंवा मोबाईल अॅपद्वारे भरता येईल. दुसऱ्या सोडतीचा दिनांक ३१/५/२०१८ नंतर कळविण्यात येईल.

वरीलप्रमाणे प्रचार/प्रसिद्धी आपल्या स्तरावरुन देण्यात यावी तसेच उपरोक्त कालावधीमध्ये मदत केंद्र कार्यन्वित राहतील याची दक्षता घ्यावी.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद,पुणे करिता**